# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ५८ वा गुरूवार दि.०१ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



लोकशाहीर, साहित्यरत्न

अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा....



-संपादक


# 'आप'च्या रेवडी संस्कृतीवरून हायकोर्टाचे सरकारवर ताशेरे

नवी दिल्ली : वृत्तसंस्था दिल्लीत २७ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळं राजिंदर नगरमध्ये युपीएससीची तयारी करणा-या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. यावर आज दिल्ली हायकोर्टात उच्चस्तरीय चौकशीची मागणी करणा-या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी हायकोर्टानं आप सरकारला 'रेवडी संस्कृती'वरुन फटकारलं.

दिल्ली हायकोर्टाचे मुख्य न्यायाधिश मनमोहन आणि न्या. तुषार राव यांच्या खंडपीठानं म्हटलं की, दिल्ली सरकारकडं पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी पैशांचा तुटवडा आहे. विशेषत: शहरातील ड्रेनेज व्यवस्था, ज्यामुळं दिल्लीत वारंवार पूरस्थिती निर्माण होत आहे. दिल्ली सरकार अनेक योजना मोफत चालवत असल्यानं दिल्लीतील लोकसंख्येत भर पडली आहे. त्यामुळेच राजिंदरनगरमध्ये एका इमारतीच्या बेसमेंटमध्ये असलेल्या लायब्ररित अभ्यास करत असलेल्या तीन युपीएससीच्या विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. याप्रकरणी हायकोर्टानं दिल्ली महापालिका आयुक्त, पोलीस उपायुक्त आणि या प्रकरणाचा तपास करणा-या अधिका-यांना २ ऑगस्टपूर्वी कोर्टासमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. कोर्टानं सुनावणीवेळी सरकारला झापताना म्हटलं की, तुम्ही बहुमजली इमारतींना व्यावसायांसाठी



परवानगी दिली आहे. पण त्या ठिकाणी व्यवस्थित ड्रेनेज सिस्टिम कार्यरत नाही. तुमच्या महापालिका दिवाळखोरीत निघाल्या आहेत. जर तुम्हाला पगार द्यायला पैसे नाहीत तर तुम्ही शहरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा कशी करणार? तुम्हाला तर रेवडी संस्कृती हवी आहे. अद्यापपर्यंत दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) अधिका-याला जबाबदार धरण्यात आलेलं नाही. कोण आहे तपास अधिकारी? पोलिसांच्या संगनमतानं दुर्घटना घडली तिथं अनधिकृत बांधकाम करण्यात आलं होतं, असं हायकोर्टानं म्हटलं आहे.

# इथेनॉल निर्मितीवरील बंदी मागे घेण्यासाठी अमित शहांना साकडे

नवी दिल्ली : वृत्तसंस्था नव्या हंगामात ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ घातलेले साखरेचे उत्पादन, हंगामापूर्वीचा साखरेचा शिलकी साठा आणि देशांतर्गत साखरेची मागणी विचारात घेऊन इथेनॉल निर्मितीवर घालण्यात आलेली बंदी उठविण्यात यावी अशी मागणी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडे करण्यात आली आहे, असे आज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी आज येथे सांगितले. इथेनॉल निर्मितीवरील बंदी उठविताना संतुलित धोरण आखण्यात यावे. ग्राहकांना साखर मिळालीच पाहिजे पण त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादन झाल्यास साखरेचा साठा वाढविण्यात अर्थ नाही. पाच वर्षांपासून उसाचे हमी भाव वाढलेले नसून उसाला



४ हजार २०० रुपये भाव देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे. 'बी हेवी' आणि 'सिरप ज्यूस'च्या इथेनॉलचे दर गेल्या वर्षीपासून वाढविलेले नाही. केंद्र सरकारने त्यावर समिती स्थापन केली आहे. सध्या साखरेचा ९० लाख टन प्रारंभिक साठा असून ५७ ते ६० लाख टन साखरेची देशांतर्गत मागणी असेल. साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्यात यावी अशा तीन प्रस्तावांसह साखर उद्योगासंबंधातील एकत्रित मुद्दे आम्ही अमित शहा यांच्यासमोर मांडले आहेत, असे हर्षवर्धन पाटील म्हणाले. इथेनॉलवरील बंदी संबंधात आम्ही दोन महिन्यांपूर्वी शहा यांची भेट घेतली. इथेनॉल बंदीनंतर ६ डिसेंबरपासून साडेसात लाख टन बी हेवी मोलॅसेसचे उत्पादन शिल्लक होते. ते वाया गेले असते. या साठ्याचे १६ ते १७ कोटी लिटर इथेनॉलमध्ये परिवर्तित करण्याची परवानगी दोन बैठकीनंतर शहा यांनी दिली. त्यामुळे सुमारे २३०० कोटी रुपयांचा महसूल संबंधित साखर कारखान्यांना उपलब्ध झाला, असे पाटील यांनी सांगितले.

# गंजगोलाई गोरगरीबांचे शॉपिंग मॉल याठिकाणी व्यापारी आणि ग्राहकांना सुविधा उपलब्ध कराव्यात. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

## गंजगोलाई मार्केट असोसिएशन व मीनी मार्केट व्यापाऱ्यांशी संवाद

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गंजगोलाई येथील सिद्धेश्वर सहकारी बँकेला सदिच्छा भेट देऊन बँकेचे सध्याचे कामकाज जाणून घेऊन विविध विषयावर चर्चा केली, तसेच गोपीनाथ तेरकर यांच्या तेरकर विमा सेवा केंद्रालाही त्यांनी सदिच्छा भेट देऊन सध्याचा विमा व्यवसाय ग्राहकांची संख्या याबाबत विविध विषयावर चर्चा केली.



लातूर / प्रतिनिधी :- गंजगोलाई हे गोरगरीबांचे शॉपिंग मॉल असून याठिकाणी व्यापारी आणि ग्राहकांना चांगल्या सुविधा उपलब्ध कराव्यात. या ठिकाणी वाहतुक व्यवस्था सुरळीत करावी, गंजगोलाईतील मोकाट जनावरे व पाणी आऊटलेटचा बंदोबस्त करावा, लातूर शहर महानगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये मनपाने फायर फायटिंग व सीसीटीव्ही बसवावेत आदी सूचना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केल्या. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी गंजगोलाई मार्केट असोसिएशन व्यापाऱ्यांची व मीनी मार्केट येथील व्यापाऱ्यांची बुधवार दि. ३१ जुलै रोजी दुपारी भेट घेऊन संवाद साधला, त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, गंजगोलाई मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष रईस टाके, रमेश कोटलवार, केऊर कामदार, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन शिवकुमार पाटील रायवाडीकर, बसवंतआप्पा भरडे, शिवाप्पा पारशेटी, मिनी मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष तात्या देशमुख, डावरे, शरद भोसले प्रशांत पेंडकर, अखिल शेख, प्रकाश क्षीरसागर, नाना पत्रिके, लातूर शहर महानगरपालिकेचे झोन सीचे क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे, क्षेत्रीय अधिकारी झोन डी बंडू किसवे, क्षेत्रीय अधिकारी झोन बी विजय राजुरे, इमरान सय्यद, आसिफ बागवान, जाफर चौधरी, रफिक नाना, रितेश चापसी, अभिषेक पतंगे, अबू मणियार, गिरीश ब्याले, अब्दुल्ला शेख, देविदास बोरुळे पाटील, करीम तांबोळी, जम्मू मणियार, गफार पटवेकर, दगडूआप्पा मिटकरी, गोरोबा लोखंडे, लक्ष्मीनारायण नावंदर अकबर माडजे, रणधीर सुरवसे, जहीर शेख आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, गंजगोलाई मार्केट असोसिएशनचे व मीनी मार्केट येथील व्यापारी उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी म्हणाले की, गंजगोलाई हे गोरगरिबांचे शॉपिंग मॉल आहे. गोलाईमध्ये खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांना जामर लावण्याचे प्रमाण वाढत आहे, गोलाईतील मोकाट जनावरे व घाण पाणी आउटलेटचा व्यापरी व ग्राहकांना त्रास होत आहे, त्यांचा बंदोबस्त करावा, गाळयाचे हस्तातरण फीस कमी करावी, पार्किंगचे टेंडर काढून लवकर निर्णय घ्यावा, लातूर शहर महानगरपालिकेचे शॉपिंग कॉम्प्लेक्स गाळे जेथे आहेत तेथे मनपाने फायर फायटिंग व सीसीटीव्ही बसवावेत असे आदी सुचना केल्या आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जाकीर हाजी हुसेनसाब बागवान यांनी केले




लोकशाहीर, साहित्यरत्न

अण्णाभाऊ साठे

यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा....



शुभेच्छा

सागर रामभाऊ तायडे, भांडुप, मुंबई


# लवकरच होणार 'या' सरकारी बँकेचे खासगीकरण; केंद्र सरकारकडून प्रक्रियेला गती!

नवी दिल्ली -इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया लिमिटेड अर्थात आयडीबीआय बँक या देशातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची बँकेचे लवकरच खासगीकरण होणार आहे.

देशातील चौथी सर्वात मोठी बँक असलेल्या आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाबाबत केंद्र सरकारने आता एक पाऊल पुढे टाकले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) आपल्या पडताळणीनंतर बँकेचा फिट अँड प्रॉपर रिपोर्ट सादर केला आहे.

खरेदीची पुढील कारवाई होणार

परिणामी, आता आयडीबीआय बँक खरेदी करण्यासाठी खरेदीदार पुढील कारवाई करू शकणार आहे. विशेष म्हणजे आता चालू आर्थिक वर्षातच आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणासाठी खरेदीदारांकडून बोली लावली जाऊ शकते. देशातील एका आघाडीच्या बिझनेस वृत्तवाहिनीने याबाबत वृत्त देत म्हटले आहे की, केंद्र सरकार आयडीबीआय बँक विकण्याबाबत वेगाने प्रक्रिया राबवत आहे. सरकारला चालू आर्थिक वर्षात आयडीबीआय बँक विकण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करायची आहे. आरबीआयचा अहवाल प्रसिद्ध झाल्याने, आता इच्छुक खरेदीदार ऑगस्टमध्ये बोली लावू शकणार आहे.

खरेदी व्यवहार झाल्यानंतर केंद्र सरकारच्या वतीने आयडीबीआय बँकेच्या व्हर्च्युअल डेटा रूममध्ये खरेदीदारास प्रवेश मिळणार आहे. जेणेकरून ते बँकेच्या आर्थिक स्थितीचा अचूक अंदाज लावू शकतील, असेही या वृत्तात म्हटले आहे. याशिवाय बँकेच्या शेअर खरेदी कराराबाबतही निर्णय घेतला जाऊ शकतो. असेही सांगितले जात आहे.

किती हिस्सा विकला जाणार?

केंद्र सरकार आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) यांची आयडीबीआय बँकेमध्ये सर्वाधिक हिस्सेदारी आहे. या दोघांना आयडीबीआय बँकेतील सुमारे ६१ टक्के हिस्सा विकायचा आहे. यापैकी सरकार ३०.४८ टक्के आणि एलआयसी ३०.२४ टक्के स्टॉक विकणार आहे. निर्गुंतवणूक विभागाने आयडीबीआय बँकेचे भागभांडवल खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या बोलीदारांची नावे आधीच आरबीआय बँकेकडे पाठवली आहेत.

दरम्यान, अर्थमंत्रालयाचे सचिव तुहीन कांत पांडे यांनी अर्थसंकल्प काळात म्हटले होते की, आम्ही आरबीआयच्या अहवालाची वाट पाहत आहोत. हा अहवाल येताच आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

अनेक दिवसांपासून रखडलीये प्रक्रिया

आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची प्रक्रिया गेल्या अनेक दिवसांपासून रखडली आहे. जवळपास ऑक्टोबर २०२२ पासून आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये अनेक अडथळे आले आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्येही सरकारने ही प्रक्रिया पुढे नेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, खरेदीदारांच्या अल्प प्रतिसादामुळे ही प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली होती. बुधवारी (ता.३१) आयडीबीआय बँकेचा समभाग ५४ पैशांच्या किंचित घसरणीसह १०३.६५ रुपयांवर बंद झाला आहे.




## संपादकीय....

# बेपर्वाईचे बळी

दिल्लीमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच यूपीएससीच्या परीक्षेची तयारी करणार्या तीन विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण केंद्राच्या तळघरात पुराचे पाणी शिरल्यामुळे बुडून मृत्यू झाल्याचा प्रकार हा दुर्दैवी आणि त्याचवेळी आपल्या व्यवस्थेच्या अकार्यक्षमतेचा ढळढळीत पुरावा आहे. तळघरामध्ये साठवणीच्या खोलीला परवानगी दिलेली असताना प्रत्यक्षात तेथे वाचनालय चालवले जात होते. पाणी शिरले तेव्हा तिथे अनेक विद्यार्थी होते. प्रशिक्षण केंद्र तळमजल्याच्या खाली आठ फुटांवर असून समोरचा रस्ता उताराचा असल्याने मुसळधार पाऊस पडल्यास पाणी झटकन तळघरात येते. ज्यावेळी ही दुर्घटना घडली, त्यावेळी वाचनालयात ३० मुले होती. पावसाचे पाणी झपाट्याने आत शिरले आणि त्यात सांडपाण्याची वाहिनीदेखील फुटली. बाहेर पडण्याचा दरवाजाही जाम झाला. त्यानंतर पाण्याचे लोटच्या लोट आत आल्यावर तो दरवाजाही तुटला आणि त्या संकटातून स्वतःची सुटका करून घेणे सर्वांना शक्य झाले नाही. अर्थात, ही दुर्घटना 'नैसर्गिक' होती, असे बिलकूल मानता येणार नाही. मुळात तळघर हे केवळ अभ्याससंबंधीचे साहित्य साठवण्यासाठी वापरले जाईल, असे या केंद्राने मान्य केले होते आणि प्रत्यक्षात तेथे वाचनालय व अभ्यासिका उघडून जादा फी उकळण्यात येत होती.


संबंधित यंत्रणेला याचा पत्ता नव्हता का? आता पोलिसांनी प्रशिक्षण केंद्राचा मालक आणि समन्वयक यांना अटक केली असून, त्यांच्या विरोधात नवीन फौजदारी कायद्यांतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. महापालिकेने शहरातील नियमांचे उल्लंघन करणार्या प्रशिक्षण केंद्रांविरोधात कारवाईला सुरुवात केली आहे. इतके दिवस महापालिका झोपली होती का? पावसाचे पाणी वाहून नेणार्या नाल्यांवरील अतिक्रमणे आता काढून टाकली जात आहेत. धोकादायक बेकायदा तळघरांविरोधात कारवाई केली जात आहे. तसेच महापालिकेच्या एका कनिष्ठ अभियंत्याला बडतर्फ करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्राला मंजुरी प्रमाणपत्र देणे, त्याचप्रमाणे नालेसफाई न होणे या मुद्द्यांवरून दिल्ली पोलिस महापालिकेच्या अधिकार्यांनाही चौकशीला सामोरे जावे लागेल. हे सर्व होईलही; परंतु ज्या तीन विद्यार्थ्यांचा जीव गेला, त्याचे काय? आपली स्वप्ने साकार करण्यासाठी उत्तर प्रदेश, तेलंगणा आणि केरळमधून हे विद्यार्थी नवी दिल्लीला आले होते. यूपीएससीसाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते. रात्रंदिवस अभ्यास करावा लागतो. या पाल्यांसाठी त्याच्या पालकांनी बराच खर्च आणि त्यागही केलेला असतो. अशावेळी सार्वजनिक यंत्रणांच्या नाकर्तेपणामुळे तरुण विद्यार्थ्यांचा बळी गेल्यावर संतापाची लाट पसरणे स्वाभाविक. म्हणूनच यूपीएससी परीक्षा देणार्या अविनाश दुबे या विद्यार्थ्याने सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना पत्र लिहून दोषींवर कडक कारवाई करण्याची तसेच साचणार्या पाण्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे संबंधित अधिकार्यांना निर्देश देण्याची विनंतीही केली आहे. सरकारला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्याची वेळ न्यायालयावर यावी, यासारखी दुर्दैवाची बाब नाही; परंतु आता आपल्या 'समृद्ध' परंपरेप्रमाणे या दुर्घटनेचे राजकारण सुरू झाले आहे. लोकसभेत भाजप खासदार बांसुरी स्वराज यांनी दिल्लीतील आप सरकारच या घटनेसाठी कारणीभूत असल्याचा आरोप केला, तर आप आणि इंडिया आघाडीच्या सदस्यांनी राज्यसभेत या सगळ्याचे खापर केंद्र सरकारवर फोडले.

खरे तर, शिक्षण हा विषय सामायिक यादीत असल्यामुळे केंद्रावरही जबाबदारी येते. कोचिंग क्लासेसचे पेव फुटले असून त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. कोचिंग क्लासेस व क्लासेसचे नियमन करा, असे केंद्राचे आदेश असल्याची माहिती शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संसदेत दिली असली, तरी केवळ आदेश देऊन उपयोगाचे नाही, तर नियमन होत आहे की नाही, हेदेखील पाहण्याची आवश्यकता आहे. याउलट दिल्लीतील प्रशासनाचे सर्वाधिकार हे नायब राज्यपालांच्या हातात असल्यामुळे आम्ही हतबल आहोत, असा युक्तिवाद करून आप सरकार हात वर करत आहे. वास्तविक, दिल्ली महापालिका, दिल्ली सरकार तसेच केंद्र सरकार यांनी राजधानीतील प्रश्न समन्वयाने सोडवले पाहिजेत. बहुसंख्य कोचिंग क्लासेस हे नियमांचे उल्लंघन करून केवळ नफेखोरी करतात. सुरक्षाविषयक नियम पाळले जात नाहीत. निवासी इमारतींत वाट्टेल तसे कोचिंग क्लासेस व व्यापारी गाळे उघडले जातात. त्यात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे तुरुंगातून कारभार हाकत आहेत. दिल्लीमधील रस्ते, प्रदूषण हे प्रश्न नीट हाताळले जात असल्याचे दिसत नाही. दिल्लीतील आरोग्य आणि शिक्षण यात आम्ही कशी सुधारणा केली, याचे ढोल आपतर्फे पिटले जात असले, तरी शिक्षणाच्या बाजारीकरणावर त्यांचे कोणतेही नियंत्रण नाही. आता या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

भाजप विरुद्ध आप या लढाईत प्रशासनाकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांना मरणयातना भोगाव्या लागत आहेत. मूळ प्रश्न कोचिंग क्लासेसचा असून, देशभर त्यांची बेबंदपणे वाढ सुरू आहे. वाट्टेल तसे शुल्क उकळताना कुबट, अंधार्या जागेत क्लासेस उघडणे, खोटे दावे करणे, पेपरफुटीचे रॅकेट चालवणे अशा अनेक गोष्टींचे पेव फुटले आहे. किमान आता तरी या आणि या व्यवस्थेमुळे निर्माण होणार्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना झाली पाहिजे. अन्यथा काळ सोकावत जाईल, यात शंका नाही.

# उपेक्षित कलावंत,परिवर्तनवादी साहित्यिक साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे

अश्या शब्दात बाबासाहेबांची शिकवण सांगत परखड आणि प्रभावीपणे लेखन करणारे,जातिभेदामुळे शिक्षणापासून,समग्र विकासापासून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्व,वैयक्तिक दुःखाचा ज्यांनी कधी विचार केला नाही. पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तोलली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर उभी आहे.अशी विज्ञानवादी भूमिका मांडणारे,महाराष्ट्र नव्हे तर साऱ्या पृथ्वीच्या पाठीवरील सर्व पीडित,दलित,शोषित, कष्टकरी यांचे शोषण संपविण्यासाठी आयुष्यभर लढा देणारे व्यक्तिमत्त्व,समाज परिवर्तनाचे शस्त्र हाती घेऊन लेखन करणारे साहित्यिक, आपल्या कलेतून ,लिखाणातून लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे लोकशाहीर,साहित्यसम्राट म्हणजेच अण्णा भाऊ साठे.



त्याकाळी जातीभेद आणि वर्णभेदावरून हिंदू लोकांनी काही दलित जातींना गावाबाहेर ठेवले होते.यांच्याकडून सनातन हिंदूंनी स्वच्छतेची कामे करून घेतली मात्र त्यांना कायम अज्ञानात आणि अस्वच्छतेत खितपत ठेवले.अश्याच एका कुटुंबात १ ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव ता.वाळवा जि.सांगली येथे अण्णांचा जन्म झाला.अण्णांची आई वालुबाई व घरातील इतर लोक दोर वळण्याच्या कामाला जात.अण्णांचे वडील भाऊराव सिद्धोजी साठे हे लेकराबाळांच्या पोटापाण्यासाठीच मुंबईत राहत असत.अण्णांचे वडील हे माळी आणि शेतीतज्ज्ञ होते.अण्णांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे असे होते.घरातली सर्व मोठी माणसे कामासाठी बाहेर जात यामुळे घरातील लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी अण्णांची होती.

अण्णांना पदोपदी जातीभेद आणि शिवाशिवी यामुळे खूप काही सहन करावे लागले.खालच्या जातीतील लोक म्हणून गावातील कुणाला शिवायचे नाही किंवा हातात हात मिळवायचा नाही नाहीतर त्यांचा विटाळ होतो म्हणे.अण्णांनी हे सर्व लहानपणीच पाहिले व अनुभवले.अण्णांना खूप प्रश्न पडायचे.त्यांचेवडील गावाकडे आले की ते त्यांना विचारायचे.मुंबईत पण शिवाशिव आहे का हो ? अण्णांचे वडील त्यांना सांगायचे ,तिथं आपलीच माणसं सारी पण शिवाशिव आहे तिथंही.खालच्या जातीतील लोकांसाठी हाटेलात चहा पिण्यासाठी फुटक्या कप बश्या ठेवतात अन त्यातच त्यांनी चहा पियायची.पण मी जिथं माळीकामाला जातो तिथं कोणतीच शिवाशिव नाही,तिथले इंग्रज साहेब त्यांच्याच कपात चहा देतात. कोणतीही शिवाशिव नाही.सगळ्याना समान वागणूक दिली जाते.पण हे आपलेच लोक आडगी आहेत.यामुळेच इंग्रज आपल्यावर राज्य करत आहेत.आपण एका देशातले असूनही एकमेकांना शिवून घेत नाही.

मुंबईत राहून भाऊराव यांना शिक्षणाचे महत्व कळले होते.यामुळे आपलेही मुलंबाळं शिक्षण घ्यावेत अशी त्यांची मनोमन इच्छा होती.त्यांच्या आग्रहामुळेच अण्णांना वयाच्या १४ व्या वर्षी शाळेत टाकण्यात आले.अण्णा एक दिवस शकत गेले.दुसऱ्या दिवशी शिक्षकाने त्यांना अक्षर गिरविण्यावरून अण्णांना शिवीगाळ आणि जबर मारहाण केली .अण्णांना ते पटलं नाही.अण्णा तडक ते शाळा सोडून घरी गेले ते कायमचे.नंतर त्यांनी कधी शाळा शिकलीच नाही. कुठल्याही शाळेत न जाता ते आपल्या स्वतःच्या क्षमतेवर शिकले. लहानपणापासूनच अण्णांचे छंद वेगळेच होते.भटकंती करणे,मध गोळा करणे,शिकार करणे हे छंद त्यांना जडले होते.मैदानी खेळ खेळण्याचा त्यांचा पिढीजात वारसा असल्याने दांडपट्टा चालविण्यात त्यांचा हात धरायला कोणी नव्हते.मोठे होत होत ऱ्यांच्या आवडीत व छंदात वाढ होत गेली.गावोगाव च्या जत्रा फिरणे ,निरीक्षण करणे हे त्यांचं आवडीचं काम झालं होतं.यानंतर त्यांना पाठांतराची भर पडत गेली. त्यांनी अनेक पोवाडे,लोकगीते ,लावण्या मुकपाठ केल्या होत्या. आणि हे सर्व ते मोठ्या आत्मीयतेने सर्वांना म्हणून दाखवत यामुळे त्यांच्या आसपास मित्रांचा गोतावळा जमायचा.

मुंबईत पोटापाण्यासाठी भटकत असताना त्यांनी बूट पॉलिश करणे,घरकाम,शिपाई,हमाली,कोळश वाहक,मुलांना खेळविणारा,कुत्र्याला सांभाळणारा,ड्रेसिंगबॉय, उधारी वसूल करणारा,खाण कामगार अशी अनेक कामे त्यांनी केली .यावरून त्यांच्या कष्टमय जीवनाची कल्पना येते.एका जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले आणि ते भाषण त्यांना स्वातंत्र्य चळवळीत उतरण्याची प्रेरणा देऊन गेलं.स्वातंत्र्य चळवळीत वेगवेगळ्या विचारधारेचे कार्यकर्ते होते.पण त्या सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे इंग्रज्यांच्या तावडीतून भारताची सुटका करणे.अण्णा कम्युनिस्ट विचारसरणीचे अनुयायी बनले.पक्षांच्या सभेचे आयोजन करणे,हॅण्डबिल्ले वाटणे,छोट्या मोठया सभेसमोर गोष्टी सांगणे,वालपेंटिंग करणे,मोर्चे काढणे,पोवाडे,लोकगीत म्हणून दाखविणे यामुळे ते कम्युनिस्ट मध्ये सर्वांना हवेहवेसे व्यक्तिमत्त्व झाले होते.त्याचवेळेस त्यांचे तुकाराम चे अण्णा या नावात रूपांतर झाले.

महाराष्ट्राच्या तमाशा या कलेच्या परंपरेत मातंग समाजाने जी वैशिष्ट्यपूर्ण भर घातली ती लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या सहभागानेच.तमाश्यात वारणेचा वाघ प्रथमच पहायला मिळाला. अण्णांनी तमाशा सारख्या कलेला अधिक प्रसिद्धी,प्रतिष्ठा आणि समृद्धी मिळवुन दिली.त्यांचे प्रत्येक पत्र,नाटक ,वगनाट्य हे अगदी ओघवत्या शैलीत असायचे.त्यांच्या प्रत्येक पात्राचे आकलन सर्वांना सहजच व्हायचे.अण्णांना बरेच वाद्य वाजवता येत असत.याचा वापर त्यांनी तमाशात केला,अण्णां बहुरंगी व्यक्तिमत्त्व तमाश्यात खुलून दिसायचं.त्यांचे पाठांतरही उत्तम होते आणि यामुळेच तमाशाच्या कलेला त्यांनी लोकनाट्यात रूपांतरित केले.या लोकनाट्यातुन त्यांनी वेळोवेळी समाजात जाणीव जागृती व प्रबोधन करण्याचे काम केले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत तसेच गोवा मुक्ती संग्रामाच्या वेळीही त्यांनी प्रचंड जनजागृतीचे काम केले.चले जावं आंदोलनात ते सहभागी झाले होते.यामुळे त्यांच्याबद्दल वारंट देखील निघाले होते.,परिणामी त्यांनी घर सोडले.कम्युनिस्ट पक्षाच्या कामासाठी पूर्णवेळ देऊ लागले.हे कार्य करत असताना त्यांनी १९४४ मध्ये ' लाल बावटा ' कला पथकाची स्थापना केली.

अण्णांची सर्वात प्रसिद्ध कादंबरी म्हणजे फकिरा.ही कादंबरी त्यांनी त्यांच्या मामा फकिरा यांच्यावर लिहिली होती. ही कादंबरी अण्णांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केलेली आहे.तसेच वारणेचा खोऱ्यात या कादंबरीत स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करणारा तरुण आणि त्याच्या प्रेयसीची कथा आहे.अण्णांनी माकडीचा माळ, वैजयंता,चिखलातील कमळ,वारणेचा वाघ,फकिरा,रूपा, चित्रा,आवडी अश्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या.३०० च्या वर कथा लिहिल्या.त्यांच्या बरबाद्या करांजी,कृष्णाकाठच्या कथा असे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.त्यांचा मुंबईचा कामगार,महाराष्ट्राची परंपरा, स्टोलीनग्राड चा पोवाडा असे पोवाडेही लिहिले.दोन अडीचशे गाणी,लावण्या त्यांनी लिहिलेल्या आहेत.अकलेची गोष्ट ,दुःकाळात तेरावा,घोटाळे अशी प्रसिद्ध वगनाट्यही लिहिली आहेत.शाहीर अमर शेख,शाहीर गव्हाणकर व अण्णांनी मिळून १९४१-१९४२ मध्ये मुंबईवर अधिराज्य गाजविले होते. चित्रपट निर्माते मॅगव्हेन्से यांनी अण्णा भाऊ साठे यांच्याविषयी म्हणाले होते की ज्या देशात पंडित जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, राज कपूर व अण्णाभाऊ साठे यांच्यासारखी माणसं ज्या देशात जन्माला येतात तो देश गरीब कसा असू शकतो.आम्हाला राज कपूर व अण्णा भाऊ साठे दया आम्ही तुम्हाला रशियाचं वैभव देऊ. अश्या शब्दात त्यांनी अण्णा भाई साठे यांचा गौरव करत त्यांच्या प्रतिभेचे महत्व सांगितले आहे.प्रतिभावंतांच्या आतली कला त्यांनी ओळखली होती.दलित, ग्रामीण साहित्यिक बाबुराव बागुल यांनी तर अण्णा भाऊ साठे यांना भारताचे मॅक्झिम गॉकी असे म्हटले आहे.गॉकी हे कटू सत्य लिहिणारे साहित्यिक होते. प्रमोद महाजन यांनी त्यांना 'महाराष्ट्राचे संत ' असा गौरव केला.साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी ' तीन पैशाचा तमाशा ' हे नाटक अण्णाभाऊ साठे यांना समर्पित केले आहे.

अण्णांची ' स्मशानातंल सोनं ' ही कथा खूप प्रसिद्ध आहे. त्यांचे माझी मैना गावावर राहिली हे छकड साऱ्या महाराष्ट्रात सर्वांना हवीहवीशी वाटते,आजही सर्वांच्या तोंडात आहे.पण जशी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या साहित्याची त्या काळात जशी उपेक्षा झाली तशीच उपेक्षा अण्णा भाऊ साठे यांची झाली.पण मराठी साहित्य विश्वात अण्णा भाऊ साठे यांचे उल्लेखनीय योगदान आहे.त्यांच्या कादंबऱ्या ,कथा,वगनाट्य मराठी साहित्याला समृद्ध करतात.अण्णा भाऊ यांच्या साहित्यिक योगदानास कुणीही नाकारू शकत नाही,तसेच त्यांचे स्वातंत्र्य चळवळीत ही उल्लेखनीय योगदान आहे.अश्या या महापुरुषाच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी सलाम ,,

*********

- विजय नारायण वाठोरे
सरसम (बु) ता.हिमायतनगर जि.नांदेड
९९७५५९३३५९

# चला वर्षानुवर्ष मांगवाड्याच्या बाहेर उभ्या असलेल्या आंबेडकरांना घरात घेऊयात...

काही जण म्हणतात या माणसांनाच खूप प्रश्न पडतात. माझ्या मते प्रश्न पडलेच पाहिजेत, ते जिवंत असल्याचे लक्षण असावे. किशोरवयीन अण्णांनाही असाच एक प्रश्न पडला असावा. म्हणून कित्येक वर्षांपासून अण्णांच्या सर्व कादंबऱ्या, पुस्तके, प्रवास वर्णन, काव्ये, चित्रपट प्रश्नच विचारत आहेत. व्यवस्थेशी, समाजाशी आणि आपल्या सर्वांशी. तो म्हणजे कि माझ्या समाजातील युवकांना या विस्कटलेल्या परिस्थीवर प्रश्न पडतो कि नाही? सर्वांना प्रश्न पडतात तसा मलाही एक खतरनाक प्रश्न पडलाय आम्हां युवकांकडून अण्णांना कोणत्या बदलाची अपेक्षा असावी? काळाभोर अंधार मागे टाकून उजेडाकडे तर सगळेच जातात. पण अंधारातल्या त्या रात्रीनं बद्दल कुणीच बोलत नाही. फकिराच्या बापाला त्याच्याच गावातल्या वेशीत कुचकरून टाकलं जातं पण त्या अघोराबद्दल बोलण्यासाठी कुणाचीच जीभ वळत नाही. सत्तूच्या पिस्तुलातली दारू दुनियेला दिसली, पण आयाबाईच्या अब्रूचे रक्षण करतो म्हणून मुखातून त्यासाठी मायेनं गायलेले गीत दिसलं नाही. मुंबई सोन्याची नगरी, घोडा-गाडी, चकमक इमारतीवर सगळे खुश पण कुठंतरी कोपऱ्यात झोपड्यांमध्ये गुरांसारखी वावरणारी माणसं बघून कुणाचाच कंठ दाटून आला नाही. एकीकडे काट्याकुपाटीच्या मागचा मांगवाड्याचं जगणं तर दुसरीकडे मलबार हिलचा कुबेरावर लिहून जगासमोर हे परखड सत्य मांडणं सोपं नव्हतं. पाण्यात राहून माशाशी वैर घेतला. जीव मुठीत घेऊन जगणं अन सिंहासारखा वागणं फक्त अन्नाला जमलं. पण हे सगळं कशासाठी? त्याने हि गप्प राहायला पाहिजे होत मेणाचं घरटं बांधून बायको-लेकरांना कुशीत घेऊन. कशाला जिंदाबाद-मुर्दाबादचे नारे देत पिंजून काढला महाराष्ट्र. तो तर परिस्थितीच्या घावामुळे शिकू शकला नाही. मग का माघारी एवढे वाङ्मय सोडून गेला असेल . कदाचित हे त्याला कळलं असेल का ? म्हणून शिकण्यावाचून बरबाद झालेल्या पिढ्या, गुलामीत सडलेला समाज, इथल्या भ्रष्ट कारभाराबद्दल, जातीपाती बद्दल, अघोऱ्या रूढी-परंपरा बद्दल, चक्रव्युहात अडकलेल्या माणसाबद्दल, पोटाच्या खळगीसाठी कुणाचाही कोथळा काढणाऱ्या गुंडांपासून रात्रीच्या जेवणासाठी देह विक्री करणाऱ्या आया-बहिणी बद्दल का त्याला हे सगळं लिहावंसं वाटलं असेल. फक्त गोष्टी घडत आहेत हे सांगण्यासाठी कि या सर्व गोष्टी समजून ऐकून तळपायाची आग मस्तकात उतरून बदल घडवण्यासाठी. आयुष्यभर रानात चरून दावणीलाच बांधलेल्या मेंढ्या-बकऱ्या सारखं जगन म्हणजे शूरवीर पणा नाही. आता खुट्याची दोरी दातांनी चिघळत-चिघळत का होईना पण त्या दावणीतून मुक्त होण्याची वेळ आली आहे. . जातीवर समूहावर झालेल्या अन्याय अत्याचाराला स्मरून त्याला प्रेरणा समजून पुढे जाऊयात. कार्ल मार्क्स च्या म्हणण्याप्रमाणे जगातला कोणताही धर्म अफूची गोळी आहे. त्याला श्रद्धे पुरती घ्यावी अन्यथा त्याला जेव्हडे चिघळाल तेवढी नशा चढेल. आपण युवकांनी स्वतः च्या अन समाजाच्या प्रगतीच्या वाटेत येणाऱ्या सर्व अडथळ्यांवर प्रश्न उपस्थित करूयात. त्याला सोडवण्यासाठी उपाययोजना आखूयात. समाजा-समाजामध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या ठेकेदारांपासून दूर राहुयात मित्रानो जातीपातीच्या दरीत खोलवर उडी मारून फक्त मृत्यूचं मिळणार आहे. याबद्दल अण्णांनी आयुष्यभर पांढरा कागद शाहीने रंगवलाय अन शाहिरीने भिजवलाय. अण्णांनी महाराजांना प्रेरणास्थान मानलं. शिवाजी माझा राजा हे कौतुक नितळ मनाने गावाच्या दरीखोऱ्यातून शहरच्या चौकाचौका पर्यंत फिरून साऱ्या जगाला सांगितलं. फक्त राजा होते म्हणून नाही तर त्यांनी त्यांचे कौशल्य, विचार, बुद्धी, स्वराज्याची संकल्पना आणि सत्तेचा वापर जनहितासाठी कसा वापरू शकतो याचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले. मित्रानो आजही वर्षानुवर्षे मांगवाड्याच्या बाहेर उभ्या असलेल्या आबेडकरांना घरात घेऊयात. त्यासाठी धर्मांतर वगैरे करण्याची गरज नाही. आपण त्यांचे न्याय,स्वतंत्र आणि बंधुतेचे विचार जाणून घेऊयात आणि त्यांना आपलं म्हणूयात. शेकडो वर्षांपासून च्या मांग-महार भांडणाला कायमचा पूर्णविराम देऊयात. आपल्या सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक अधिकाराचे अंतर कमी करून आपल्याला स्वाभिमानाने वावरण्यासाठी समाजाचे दरवाजे त्यांनीच खोलले आहेत. याचाच पुरस्कार म्हणून अण्णाभाऊंनी आंबेडकरांना फकिरा कादंबरी अर्पण केली. अण्णाभाऊंच्या या दूरदृष्टीचा सम्मान करण्याची आज खऱ्या अर्थात गरज आहे. मांग समाज आता अज्ञानाला विळखा घालून बसला नसून तो प्रगतीच्या वाटेवर चालणारा समाज आहे. विचार करणारा बौद्धिक प्रबळता असणारा समाज आहे. सर्वच क्षेत्रात नेतृत करण्यासाठी सक्षम असणारा समाज आहे. अजून एक मुख्य समज आपण विकसित करूयात. ती म्हणजे संविधान म्हणजे एका विशिष्ठ समाजाची मक्तेदारी आहे. त्याचं आणि आमचा काहीच संबंध नाही. हि भावना अलीकडच्या काळात आपल्या समाजामध्ये मध्ये रुजवली गेली आहे. आपल्याला गावकुसाबाहेरून थेट मुख्य गावात प्रवेश मिळाला. कसायला जमिनी दिल्या, पोराबाळांचा कंटाळा करणारी शाळा आज त्यांचा गौरव करत आहे. अडाण्याचा हाताला काम मिळालं, शिकलेल्यांना नोकऱ्यांची संधी मिळाली, ज्यांना आपल्या सावलीचा विटाळ होता आज त्यांच्या समोर ग्रामपंचायती मध्ये माडीवर मांडी टाकून प्रश्न विचारत आहोत, हे सगळं वैभव, एवढा सम्मान आपल्याला आपल्या देशाच्या संविधानाने दिलाय मग त्याला एवढे अंतर आपण का द्यायचे?. त्याबद्दल पसरणाऱ्या अपप्रचाराला आपण बळी का पडायचं? उलट अशा दृष्ट विचारणा आपल्या मन मध्ये सुईच्या टोकाएवढी जागा ठेवणार नाही अशा प्राणच या जयंतीच्या निमित्ताने आपण करूयात. माझ्या आजी-आजोबांनी जयंती साजरी केली, त्यांनतर आई-बाबानी केली म्हणून मी जयंती करणार असाल तर जयंती करू नका. एखाद्या गोष्टीचा करणीकरण भाव जर आपल्याला माहित नसेल तर माहित करून घ्या. आणि अज्ञानात राहून अन्नाची जयंती साजरी करायची असे तर तुम्ही त्यांचा अपमान करत आहात. विषमतेच्या जातीवाद्यांनी तुकाराम महाराजांच्या गाथा तर अगोदरच बुडवल्या गेल्या होत्या. आपण अण्णाभाऊंना न समजता जयंती करत गेलो तर आपण या तुकारामाच्याही गाथा दरवर्षी अप्रत्यक्षरीत्या बुडवत राहू. आपली आणि समाजाची सामाजिक, आर्थिक, राजनैतिक आणि बौद्धिक प्रगती म्हणजे अन्नाच्या जयंतीचे सार्थक असेल. हि परिस्थिती बदलण्याचे कार्य आपण युवकांनी खांद्यावर घेऊयात. अण्णांची प्रेरणा घेऊन समाजाच्या विकासासाठी व्यवस्थेला प्रश्न विचारत राहू. हि वेळ संघटित होण्याची आहे. जातीपातीच्या चिल्हर भांडणात अडकण्याची नाही. शिक्षण, नोकऱ्या, व्यवसाय करण्याची हि वेळ आहे. नवनवीन तंत्रज्ञान, कल्पना, उंच भराऱ्या घेण्याची वेळ आहे. गावातल्या पोरी-पोरांनी गावात शाळा म्हणून थांबायची नाही तर थोडं दूरवर जाऊन शिकण्याची, काही कॉलेजात जायची वेळ आहे. काहींनी शिकून सवरून योग्य वेळी राजकारणात प्रवेश करण्याची वेळ आहे. पोलीस, डॉक्टर, इंजिनियर आवडेल त्या क्षेत्रात प्राविण्य मिळवण्याची वेळ आहे. एकंदरीत जगाच्या वेगाने त्यांच्या प्रगतीच्या मार्गावर आपणही सामील व्हायला होत आहोत हे छाती ठोकून सांगण्याची वेळ आहे. कदाचित याच अपेक्षेने अण्णांच्या सर्व कादंबऱ्या, पुस्तके, चित्रपट प्रश्न विचारत असतील. आपण या जयंतीला या सर्व प्रश्नाची उत्तरे शोधुयात.




**********

आपला साथी
प्रविण सुनिता रतन बोरकर.
संपर्क : ९७६८७७२७१८

# भारतात दिवसेंदिवस डेंग्यूची प्रकरणे का वाढतायत? काय आहेत यामागील कारणे; जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात.

भारतात दरवर्षी डेंग्यूच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. देशाच्या बहुतेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडतो आणि त्यामुळे जुलै व सप्टेंबर महिन्यांमध्ये डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ दिसून येते. नॅशनल सेंटर फॉर व्हेक्टर बोर्न डिसीजेस कंट्रोल ने दिलेल्या माहितीनुसार, भारतात कोरोनानंतरच्या काळात डेंग्यूच्या आजारांमध्ये वाढ झाली आहे. या वर्षी भारतात जवळपास १९,४४७ डेंग्यूची प्रकरणे समोर आली आहेत. सरकारी आकडेवारीनुसार कर्नाटक, दिल्ली, केरळ, सिक्कीम व हरियाणा यांसारख्या राज्यांमध्ये दरवर्षी डेंग्यूची अनेक प्रकरणे दिसून येतात. आता महाराष्ट्रातील पुणे, नागपूर यांसारख्या शहरांतसुद्धा डेंग्यूने थैमान घातले आहे. भारतात दिवसेंदिवस डेंग्यूची प्रकरणे का वाढत आहेत? डेंग्यूच्या रुग्णांची आकडेवारी का कमी होत नाही? त्यामागील कारणे, लक्षणे आणि उपाय याविषयी राज्याचे वरिष्ठ आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप आवटे यांनी 'लोकसत्ता ऑनलाईन'ला सविस्तर माहिती दिली. दिवसेंदिवस डेंग्यूची प्रकरणे का वाढत आहेत? डॉ. प्रदीप आवटे : वाढते शहरीकरण आणि हवामानातील बदल या दोन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. एडिस हा असा डास आहे की, त्या डासाला वाढण्यासाठी शहरीकरणामुळे पोषक वातावरण मिळते. उदा. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. शहरातील लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या ही झोपडपट्ट्यांमध्ये राहते. तेथे पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा आदी सर्व मूलभूत सुविधा पुरविण्यात अडचणी येतात. पाणीपुरवठा कमी असल्यामुळे पाणी साठवून ठेवण्याची गरज भासणे, खूप मोठ्या प्रमाणावर विल्हेवाट करण्याजोग्या वस्तूंचा वापर करणे इत्यादी गोष्टी डास वाढण्यास कारणीभूत असतात. पाण्याच्या बाटल्या असो किंवा चहाचे कप असो, ते एकदा वापरले की, आपण फेकून देतो. पण, अशा वस्तूंमध्ये जेव्हा पावसाचे पाणी साचते, तेव्हा एडिस डास वाढतो. शहरात खराब झालेले टायर कुठेही पडलेले असतात, त्या टायरमध्ये पावसाळ्यात पाणी साठते आणि त्यातसुद्धा डासांची उत्पत्ती होते. शहरात बांधकामे किंवा विकासकामे सुरू असतात तेव्हा जे रस्ते खोदलेले असतात, त्यात पावसाळ्यात पाणी साठते आणि मग तेथे डास वाढतात. एडिस हा स्वच्छ पाण्यामध्ये वाढणारा डास आहे. जसा पाऊस सुरू होतो, तसे सगळीकडे पाणी साठत जाते आणि एडिस डासांची उत्पत्ती होत राहते. मागील काही काळामध्ये मान्सूनचा पॅटर्न बदलला आहे. पूर्वी पाऊस थोडा थोडा पडायचा. आता महिनाभराचा पाऊस एकदोन दिवसांमध्येच पडून जातो. तुम्ही जर लक्षात घेतले, तर तुमच्या लक्षात येईल की, नागपूरमध्ये दोन दिवसांमध्ये २२७ मिलिमीटर पाऊस पडला. म्हणजे पूर्ण महिन्याचा पाऊस दोन दिवसांतच पडला. पूर्वी तसे नव्हते. असा एकत्रित पाऊस पडला, तर डासांना अंडी निर्माण करण्यासाठी आवश्यक उष्णतासुद्धा मिळते. जागतिक तापमानवाढीमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. अंड्यांपासून डास तयार होण्यासाठी २८ दिवसांचा काळ लागायचा; पण जागतिक तापमानवाढीमुळे फक्त २१ दिवसांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण होते. त्यामुळे डेंग्यूची प्रकरणे दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसत आहे. लोकसहभाग का महत्त्वाचा? डॉ. प्रदीप आवटे : आरोग्य यंत्रणेबरोबर लोकसहभागही खूप महत्त्वाचा आहे. लोकांना हे कळले पाहिजे की, डेंग्यू हा आजार कसा पसरतो? घराच्या परिसरात हे डास वाढू नयेत म्हणून आपली काय जबाबदारी आहे, हे लोकांनी समजून घेतले पाहिजे. कारण– शासकीय यंत्रणेला प्रत्येकाच्या घरी जाणे शक्य नाही. उदा. सोसायटीच्या इमारतीवर पाण्याचा टँक आहे आणि त्याचे झाकण लावले नाही, तरी एडिस डास वाढू शकतात. जेव्हा तुम्ही पाणी साठवता तेव्हा ते झाकले पाहिजे; अन्यथा डासांना अंडी घालायला आणि त्यांची संख्यावाढीला पोषक वातावरण मिळते. डेंग्यूची लक्षणे कशी ओळखावीत? डॉ. प्रदीप आवटे : डेंग्यूची प्राथमिक लक्षणे खालीलप्रमाणे– खूप तीव्र ताप अंगदुखी तीव्र डोकेदुखी कधी कधी शरीरावर लालसर चट्टे पडणे. गंभीर प्रकरणात, काही वेळा उलटी होणे, पोटदुखी व मळमळ वाटणे ही लक्षणे व्हायरल फ्लूसारखी असतात. डेंग्यूच्या निदानासाठी आवश्यक चाचणीची गरज असते. पहिल्या पाच दिवसांत चाचणी करायची असेल, तर एनएस१ चाचणी करू शकता. त्यानंतरच्या काळामध्ये शरीरात आयजीएम अँटीबॉडिज तयार होतात, मग आयजीएम चाचणीसुद्धा करता येते. त्यामुळे प्रयोगशाळेच्या चाचणीतूनसुद्धा डेंग्यू ओळखता येतो. जेव्हा रक्तस्रावी ताप येतो, तेव्हा रुग्णाची अवस्था गंभीर होत जाते.





डेंग्यूवर कशा पद्धतीने उपचार करावेत यासंबंधीचे प्रशिक्षण डॉक्टरांना पावसाळ्यापूर्वी दिले जाते. त्यात कोणता रुग्ण सौम्य स्वरूपाचा आणि कोणता गंभीर स्वरूपाचा आहे हे कसे ओळखायचे याविषयीची माहिती दिली जाते आणि आता त्याचा फायदा दिसून येत आहे. डेंग्यूचे रुग्ण वाढताहेत; पण डेंग्यूमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण तुलनेने कमी होत आहे.

डेंग्यूची लस कधी येणार? डॉ. प्रदीप आवटे : डेंग्यूच्या लसीवर सध्या चाचणी सुरू आहे. लस जोपर्यंत पूर्णपणे तयार होत नाही, तोपर्यंत आपण ती लस वापरू शकत नाही. कोरोना काळात आपण खूप वेगात लस आणली; पण त्या वेळची गरज वेगळी होती. सर्वसामान्य परिस्थितीमध्ये एखादी लस विकसित होण्यासाठी ५ ते १२ वर्षांचा कालावधी लागू शकतो.

डेंग्यू हा विषाणूमुळे होणारा आजार आहे; पण डेंग्यूचा एकच नव्हे, तर चार विषाणू आहेत. त्यांना आपण डेन १, डेन २, डेन ३ व डेन ४, असे म्हणतो. वेगवेगळ्या भागामध्ये डेंग्यूचे वेगवेगळे विषाणू सापडतात. या सर्वांचा विचार करून आणि तांत्रिक चुका टाळून आपण लस वापरू शकतो आणि त्यावर सध्या अभ्यास सुरू आहे. आता ही लस अंतिम टप्प्यात आहे त्यामुळे येत्या दोन वर्षांत डेंग्यूची लस आपल्या हाती येऊ शकते. येणारी प्रत्येक लस ही १०० टक्के गुणकारी असते, असे नाही. परंतु, ही लस काही टक्के गुणकारी असू शकते. त्यामुळे लस ही पूर्णपणे एखाद्या आजाराचे उत्तर असते, असे नाही. डेंग्यूचा आजार कसा रोखता येईल? डॉ. प्रदीप आवटे : एखाद्या शहराचा चांगल्या पद्धतीने विकास करणे, लोकांना परवडणारी घरे उपलब्ध असणे, सांडपाण्याचा निचरा, योग्य त्या प्रमाणात पाणीपुरवठा या प्रकारच्या सुविधा असणे महत्त्वाचे आहे. डेंग्यूचा जो एडिस डास आहे, त्याच्या वाढीकरीता जी खास ठिकाणे आहेत, ती कशी कमी करता येतील, यावर उपाय करणेसुद्धा गरजेचे आहे. डेंग्यूच्या प्रतिबंधामध्ये लोकांचा सहभाग हा खूप महत्त्वाचा घटक आहे. एडिस हा दिवसा चावणारा डास आहे; तो रात्री चावत नाही. त्यामुळे डेंग्यूचा डास हा स्वाभाविकपणे फक्त घरच नव्हे, तर तुम्ही जिथे नोकरी वा व्यवसाय करता किंवा तुमचे कामाचे ठिकाण अशा ठिकाणी तुम्हाला चावू शकतो. थोडक्यात, तुमचे फक्त घरच नव्हे, तर तुम्ही जिथे काम करता, ते ठिकाणसुद्धा डासमुक्त असणे आवश्यक आहे. दिल्ली हे देशातील एक मोठे शहर आहे. तिथे दरवर्षी पावसाळ्यात डेंग्यूच्या रुग्णांची वाढ दिसून येते. दोन वर्षांपूर्वी तिथे सरकारने '१० आठवडे, १० वाजता, १० मिनिटे' अशी एक मोहीम राबवली होती. १० आठवडे म्हणजे जुलै, ऑगस्ट व पुढील दोन आठवडे, १० वाजता दिल्लीतील लोक ज्या ठिकाणी काम करायचे, तिथे फक्त १० मिनिटे वेळ काढायचे आणि डास उत्पादक जागा शोधून, त्या जागा स्वच्छ करायचे आणि जिथे डास दिसतील तिथे अळीनाशक वापरून अळ्या नष्ट करायचे. डेंग्यू रोखण्यासाठी वैयक्तिक पातळीवर कोणती पूर्व काळजी घ्यावी? डॉ. प्रदीप आवटे : पावसाळ्यात पूर्ण अंगभर कपडे घाला. डेंग्यूची गंभीर लक्षणे मुख्यत्वे १५ वर्षांखालील मुलांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतात. लहान मुलांसाठी दिवसा झोपतानासुद्धा पूर्ण पलंग आच्छादणारी मच्छरदाणी (बेडनेट) वापरले पाहिजे. ज्या ठिकाणी तुम्हाला पाणी साठवावे लागते, तिथे एक दिवस कोरडा दिवस पाळा आणि त्यात नवीन ताजे पाणी भरा. मनाप्रमाणे औषधे घेऊ नका. ॲस्पिरिनसारखी औषधी घेतल्यास साधा डेंग्यू हा रक्तस्रावी डेंग्यूमध्ये परावर्तित होऊ शकतो. डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घ्या. ९० टक्के डेंग्यूचे रुग्ण हे सौम्य स्वरूपाचे असतात. साधी विश्रांती, तापावरचे औषध, भरपूर पाणी वा नारळ पाण्याचे सेवन अशा प्रकारे काळजी घेतल्यामुळे ९० टक्के रुग्ण बरे होतात. अगदी १० टक्के रुग्णांना डॉक्टरांकडे जाणे आणि एक ते दोन टक्के रुग्णांनाच रुग्णालयात दाखल करण्याची गरज पडू शकते.

# केळी खाऊ घातल्याने बाळाला खरंच शांत झोप लागते? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत




डॉक्टर अनेकदा बाळ सहा महिन्यांचे झाल्यानंतर त्यांच्या शारीरिक वाढ आणि विकासासाठी त्यांना केळी खाऊ घालण्याचा सल्ला देतात. पण, केळ्याच्या सेवनाने बाळाला चांगली झोप लागू शकते? एका झोपेशी संबंधित सल्लागाराने त्याच्या इन्स्टग्रामवर शेअर केलेल्या पोस्टनुसार, केळ्यांमध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते, जे स्नायूंना आराम आणि मज्जातंतू शांत करण्यास मदत करते. त्यामुळे लहान बाळाला अधिक शांत झोप येते. याव्यतिरिक्त त्यात ट्रिप्टोफॅन, एक अमिनो ॲसिड असते जे सेरोटोनिनमध्ये आणि नंतर मेलाटोनिनमध्ये रूपांतरित होते, जे झोपेला नियंत्रणात ठेवणारे हार्मोन आहे. त्यामुळे बाळाला शांत झोप येण्यासाठी त्याला नित्यक्रमानं केळी खाऊ घालण्याचा विचार करा, असे लिहिण्यात आले आहे. अनेक पालकांना त्यांच्या बाळाला रात्री झोपवण्यासाठी खूप धडपड करावी लागते. त्यामुळे आम्ही सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या सल्लागाराच्या पोस्टमागील सत्य पडताळून पाहिले. त्यासाठी आम्ही एका तज्ज्ञांचा सल्ला घेतला. डॉ. संजू सिदाराद्दी, सल्लागार बालरोगतज्ज्ञ आणि नवजात रोग विशेषज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स खारघर, नवी मुंबई यांनी आम्हाला सांगितले, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, फायबर, मॅग्नेशियम व पोटॅशियम यांसारख्या जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध असलेली केळी त्यांच्या मऊ आणि पचायला हलक्या अशा गुणधर्मांमुळे मुलांच्या रोजच्या आहारात समाविष्ट केली जातात. मॅग्नेशियम आणि पोटॅशियम स्नायूंना आराम देतात; ज्यामुळे बाळाला चांगली झोप येऊ शकते.

डॉ. सिदाराद्दी पुढे म्हणाले, केळी सेरोटोनिन आणि मेलाटोनिनच्या उत्पादनास प्रोत्साहन देऊ शकतात; ज्यामुळे तणाव आणि चिंता कमी होण्यास मदत होते आणि त्यामुळे झोप येण्यास मदत होते. रिसर्च गेट अभ्यासामध्ये लहान बाळांना केळी खाऊ घालण्यावर आणि त्यामुळे येणाऱ्या झोपेवर अभ्यास करण्यात आला आहे. परंतु, बाळाला केळी खाऊ घालणे आणि त्यानंतर येणारी झोप यावरील चांगल्या दर्जाचे संशोधन फार कमी आहे, असा दावा डॉ. सिदाराद्दी यांनी केला. डॉ. सिदाराद्दी यांनी सांगितले, जर तुमच्या लहान बाळाला रात्री शांत झोप येत नसेल, तर काही घरगुती उपाय किंवा पर्यावरणीय बदल करून पाहा. ही समस्या सतत वाढत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेण्याचा विचार करा तज्ज्ञांनी नमूद केले की, बाळाला रात्री शांत झोप न येण्यामागे विविध कारणे असू शकतात. पण त्याच्या प्रभावी निदानासाठी त्यांची त्वरित तपासणी केली जाणे अत्यावश्यक आहे, असे डॉ. सिदाराद्दी यांनी सांगितले.

# 'झिरो रिटर्न' का भरावे?

आपले उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असले तरीही आयकर विवरणपत्र म्हणजेच इन्कमटॅक्स रिटर्न भरले पाहिजे, असे करसल्लागार आवर्जून सुचवतात. या प्रकारच्या रिटर्नला शून्य किंवा शून्य प्राप्तिकर परतावा, असे म्हणतात. झिरो आयटीआर दाखल करण्यातून आपण कर अधिकार्यांना औपचारिकरित्या कळवत असतो की, आपले उत्पन्न संबंधित आर्थिक वर्षात करपात्र मर्यादेपेक्षा कमी होते आणि त्या कालावधीसाठी करदायित्व नाही. आयकर कायद्यानुसार, मूळ सवलतीच्या मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांसाठी रिटर्न भरणे बंधनकारक नाहीये; पण करदात्याने अनुपालनासाठी आणि आर्थिक नोंदी राखण्यासाठी शून्य रिटर्न भरले पाहिजे. याचे कारण पासपोर्टसाठी अर्ज करायचा असेल किंवा व्हिसा घ्यायचा असेल, तर आयकर रिटर्न तुमचा पत्ता पुरावा बनतो. याशिवाय, जर तुम्हाला बँकेकडून कर्ज घ्यायचे असेल, तर ते मंजूर होण्यासाठी आयकर रिटर्न आवश्यक आहे. बँका तुमच्या ठेवींवरील व्याजातून टीडीएस कपात करत असतात. अशा परिस्थितीत, या टीडीएसचा परतावा मिळविण्यासाठी शून्य आयटीआर दाखल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संबंधित संस्था सल्लागार किंवा फ्रीलान्सरना केलेल्या पेमेंटवर तुम्ही टीडीएसदेखील कापू शकता. तुम्हाला मागील आर्थिक वर्षात झालेल्या नुकसानाची वजावट भविष्यातील कोणत्याही उत्पन्नामधून करायची असेल, तर ते पुढे नेण्यासाठी तुम्ही रिटर्न भरणे आवश्यक ठरते. या रिटर्नद्वारे तुमचे नुकसान नोंदवले जाईल आणि भविष्यात उत्पन्न किंवा नफ्याच्या बदल्यात हा तोटा दाखवून कर कपातीचा लाभ घेता येतो. झिरो रिटर्न तुमच्या उत्पन्नाचा पुरावा म्हणूनदेखील काम करतो. ज्यांचा स्वतःचा रोजगार आहे किंवा ज्यांचे उत्पन्न नियमित नाही, त्यांच्यासाठी हा एक अतिशय महत्त्वाचा दस्तऐवज आहे कारण त्यामुळे आर्थिक बाबतीत त्यांची विश्वासार्हता वाढते. तसेच झिरो रिटर्न भरल्याने तुम्ही कर नियमांचे पालन करत आहात, याची खात्री होते. यामुळे रिटर्न न भरल्याबद्दल आकारला जाणारा संभाव्य दंड टाळण्यास मदत होते. बंधनकारक नसले तरी झिरो आयटीआर भरतानाही अचूक माहिती देणे महत्त्वाचे आहे. उत्पन्नाच्या स्रोतांवर अवलंबून योग्य आयटीआर फॉर्म वापरला पाहिजे. उत्पन्नाचे सर्व स्रोत नमूद केले पाहिजेत. करदात्यांच्या काही श्रेणींसाठी आयटीआर दाखल करणे अनिवार्य आहे. कोणत्याही बँक किंवा सहकारी बँकेच्या चालू खात्यात जमा केलेली एकूण रक्कम १ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यास आयटीआर भरणे अनिवार्य आहे. जर तुम्ही स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी, परदेश प्रवासासाठी २ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च केला असेल, तर आयटीआर भरणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे एखाद्या करदात्याने वर्षभरात एक लाख रुपयांपेक्षा जास्त वीज बिल भरले असेल तरीही आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक आहे.



# प्रेग्नन्सीदरम्यान माझे ३५ किलो वजन वाढले होते, सोनम कपूरने केला खुलासा; डॉक्टरांनी सांगितले कारण

अनेक सेलिब्रिटींनी त्यांच्या प्रेग्नन्सी आणि प्रेग्नन्सीनंतरच्या प्रवासाबद्दल खुलासा केला आहे, परंतु त्या यादीत अभिनेत्री सोनम कपूर आघाडीवर आहे. सोनम मोकळेपणाने आपल्या प्रेग्नन्सीबाबत संवाद साधताना दिसते. २०२२ मध्ये तिचा पहिला मुलगा वायु कपूर आहुजा याला तिने जन्म दिला होता. प्रेग्नन्सीदरम्यान सोनमचे वजन जवळपास ३५ किलोने वाढले होते, यामागील कारण तिने उघड केले. जेव्हा मी प्रेग्नंट होते, तेव्हा माझे वय ३५ पेक्षा जास्त होते. मी प्रेग्नन्सीच्या पहिल्या तीन महिन्यांत प्रोजेस्टेरॉनचे शॉट्स घेतले होते, त्यामुळे माझे वजन खूप वाढले होते, असे सोनमने तिच्या चॅनेलवर मॉम ब्लॉगर तान्याला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.




सोनम कपूरने हे देखील शेअर केले की, तिच्या आहारात खूप पाणी पिणे आणि कलिंगड आणि आंबासारखी भरपूर फळे खाणे समाविष्ट होते. त्या सर्व गोष्टींचा तिला गर्भधारणेमध्ये फायदा झाला. शरीरातील पाण्याची पातळी वाढवणे आवश्यक आहे, असे सोनमने सांगितले. प्रोजेस्टेरॉन शॉट्स शरीरात कसे कार्य करतात? गर्भपाताच्या इतिहासात किंवा इतर गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये गर्भधारणेला मदत व्हावी यासाठी प्रेग्नन्सीच्या पहिल्या तीन महिन्यांत अनेकदा प्रॉजेस्टेरॉन शॉट्स लिहून दिले जातात. अनेक शारीरिक परिणामांमुळे वजन वाढू शकते. प्रोजेस्टेरॉन पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता वाढवते, ज्यामुळे शरीरातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झाल्याने वजन लक्षणीय वाढते. तसेच हे भूक उत्तेजित करते, ज्यामुळे उच्च कॅलरीजचे सेवन वाढते आणि त्यानंतर वजन वाढते. याव्यतिरिक्त प्रोजेस्टेरॉनमुळे होणारे हार्मोनल बदल शरीराला (विशेषत: पोटाभोवती) अधिक फॅट्स साठवण्यास प्रवृत्त करू शकतात, असे डॉ. प्रियंका सुहाग यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना स्पष्ट केले. त्या दिल्लीच्या सीके बिर्ला हॉस्पिटलमध्ये प्रसूती आणि स्त्रीरोग विभाग सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

कोण घेऊ शकते प्रोजेस्टॉन शॉट्स? ३५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांसाठी, गर्भधारणेदरम्यान मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या वाढत्या जोखमीमुळे प्रोजेस्टेरॉन शॉट्सचा वापर काळजीपूर्वक करणे आणि व्यवस्थित प्रसूतीपूर्व निरीक्षण करण्याची आवश्यकता आहे, असे तज्ज्ञांनी नमूद केले.

प्रोजेस्टेरॉन वापरण्याचा निर्णय व्यक्तीच्या आरोग्याचा इतिहास आणि सद्यस्थिती लक्षात घेऊन तयार केला पाहिजे, असे डॉ. सुहाग यांनी नमूद केले. प्रत्येक गर्भवती महिलेला प्रोजेस्टॉनची गरज नसते? डॉ. सुहाग यांच्या म्हणण्यानुसार सर्व गर्भवती महिलांना प्रोजेस्टेरॉनच्या गोळ्यांची गरज नसते. या गोळ्या सामान्यत: गर्भपाताचा इतिहास असलेल्यांना, खतऋसारखे काही प्रजनन उपचार घेत असलेल्यांना किंवा नऊ महिन्यांपूर्वी बाळाच्या जन्माची जोखीम कमी करण्यासाठी लहान गर्भाशय असलेल्या महिलांना डॉक्टर हे औषध घेण्याची शिफारस करतात. गर्भधारणेदरम्यान प्रोजेस्टेरॉनच्या वापराबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी वैयक्तिकृत सल्ल्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि संभाव्य दुष्परिणाम याबाबत चर्चा करणे महत्त्वाचे आहे, असे डॉ. सुहाग यांनी स्पष्ट केले.

# दररोज ३० मिनिटे सायकल चालविल्याने तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल? डॉक्टरांकडून जाणून घ्या



स्वत:ला निरोगी ठेवण्यासाठी शारीरिक हालचाली करणे खूप महत्त्वाचे आहे. मात्र, या व्यग्र जीवनशैलीत लोकांची शारीरिक हालचाल खूप कमी झाली आहे. त्यामुळे लोक अनेक गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत. व्यायाम हा आपल्या आरोग्यासाठी फारच महत्त्वाचा असतो. त्यातून अनेकांना व्यायाम रोज करायला जमतही नाही. तेव्हा सायकल चालवणे हा सोपा आणि स्वस्तात मस्त असा पर्याय आहे. मग दररोज ३० मिनिटे सायकल चालविण्याने तुमच्या शरीरावर काय परिणाम होईल, तुम्हाला माहिती आहे का, या विषयावर डॉ. वज्रला श्रावणी यांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ. डॉ. श्रावणी म्हणतात, निरोगी राहण्यासाठी शारीरिक हालचाली खूप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे रोगांचा धोका कमी होतो आणि फिटनेस सुधारतो. आजकाल फार कमी लोक सायकल चालविताना दिसतात. तुम्हाला माहिती आहे का की, सायकल चालवणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. सायकलिंग ही एक उत्तम एक्सरसाइज आहे, असे अनेक जण म्हणतात. सायकल चालविण्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. सायकल चालविणे तुमच्या स्नायू, हाडे आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

रोज ३० मिनिटे सायकल चालविण्याचे फायदे नियमित सायकलिंगमुळे हृदय निरोगी राहते. त्याचप्रमाणे संपूर्ण शरीरात रक्ताभिसरण देखील सुधारते. सायकल चालवणे ही एक शारीरिक क्रिया आहे, जी हृदय निरोगी ठेवते. सायकलिंग केल्याने शरीरात आवश्यक प्रथिने तयार होतात. पांढऱ्या रक्तपेशी या उत्तेजित होऊन आपली रोगप्रतिकारशक्ती ही सुधारते. सायकलिंग केल्याने आपली सहनशक्ती, तसेच रोगप्रतिकार शक्तीही सुधारते. सायकलिंग केल्याने माणसाची सहनशक्तीही वाढते. दररोज अर्धा तास सायकलिंग केली, तर तुम्हाला चांगले परिणाम दिसून येतील. सायकल चालविल्याने शरीरातील अतिरिक्त कॅलरीज बर्न होतात आणि त्यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. सायकल चालविल्याने तुमचे मानसिक आरोग्यही सुधारते. याचा मेंदूतील रक्तप्रवाहावर सकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे मेंदूमध्ये जास्त ऑक्सिजन पोहोचतो. अशा प्रकारे मेंदूच्या नवीन पेशी तयार करण्यासाठी अधिक प्रथिने तयार होतात. त्यामुळे तुमची स्मरणशक्ती देखील वाढते. नियमित सायकल चालवल्याने शारीरिक आरोग्य तर चांगले राहतेच. त्याचबरोबर मानसिक आरोग्यदेखील सुधारते. त्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होऊ शकते आणि तणाव, नैराश्य व चिंता कमी होण्यादेखील मदत होते.

# संतोष मोरे यांची जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनच्या लातुर जिल्हाध्यक्षपदी निवड

लातूर (प्रतिनिधी):– छत्रपती संभाजीनगर येथे दि.२७ जुलै रोजी जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनचे तिसरे विभागीय अधिवेशन वाळूज एमआयडीसी येथील हॉटेल राजयोग येथे संपन्न झाले. या अधिवेशना दरम्यान लातूर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी संतोष मोरे यांना देण्यात आली. जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनचे तिसरे विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाले असून या अधिवेशनात लातुर येथील प्रतिष्ठीत व्यापारी संतोष मोरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र आहेर, प्रदेश अध्यक्ष यशवंत शिरसाठ, राष्ट्रीय संघटक राम घरत, राष्ट्रीयविधी मार्गदर्शक ॲड. गजानन ठाकरे, राष्ट्रीय सचिव ह.भ.प. वाल्मीक महाराज जाधव, मराठवाडा संघटक अर्जुन आदमाने पाटील, ज्येष्ठ उद्योगपती साहेबराव पाथरीकर यांच्या हस्ते त्यांना लातूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्त केले. तसेच नियुक्तीपत्र देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मा.जि प.सदस्य अनिलभैय्या चोरडिया, मराठवाडा नेते कैलास भोकरे, पोपटराव आदिक, काकासाहेब चेळेकर, रामदास पैठण पगारे, राजूभाऊ



पवार, विजुभाऊ जाधव, सतीश हिवाळे यांच्यासह मुंबई, पुणे, भिवंडी, ठाणे नाशिक, बीड, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली या ठिकाणाहून असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान संतोष मोरे यांना जागतिक मानव अधिकार सुरक्षा फेडरेशनच्या लातूर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल त्यांचे नातेवाईक, मित्र परिवार व सामाजिक संघटनांच्यावतीने अभिनंदन होत आहे.

# लातूर जिल्ह्यात १ ऑगस्ट रोजी मद्यविक्री बंद

लातूर :– जिल्ह्यात १ ऑगस्ट, २०२४ रोजी लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती विविध सामाजिक उपक्रम, कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिले आहेत. मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ नुसार तसेच या कायद्यातंर्गत केलेल्या विविध नियमानुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनुषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

# 'जेएसपीएम'चे अध्यक्ष अजित पाटील कव्हेकरांच्या विरोधात गुन्हा दाखल; दोघे ताब्यात

लातूर : प्रतिनिधी माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर यांच्या जयक्रांती शिक्षण प्रसारक मंडळाद्वारा (जेएसपीएम) संचलित येथील जुन्या एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ वसतिगृहात अरविंद राजेभाऊ खोपे (रा. पांगरी, ता. परळी) या इयत्ता ७ वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या १३ वर्षीय मुलाचा दि. २९ जुलै रोजी संस्थेतच संशयास्पद मृत्यू झाला. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात 'जेएसपीएम' अध्यक्ष अजित शिवाजी पाटील कव्हेकर यांच्यासह ५ जणांविरुद्ध अरविंदच्या मरणास जबाबदार असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना ताब्यात घेण्यात आली आहे.

'जेएसपीएम' संस्थेत अरविंद खोपे या अल्पवयीन मुलाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली. मुलाचा खून करण्यात आल्याचा आरोप करीत पालक व नातेवाईकांनी 'जेएसपीएम' संस्थेसमोर आक्रोश करीत ठिय्या मांडला. या घटनेने लातूर शहरात एकच खळबळ उडाली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात 'जेएसपीएम' संस्थेत कर्तव्यावर असलेल्या टेकाळे व सूर्यवंशी नामक व्यक्तींवर पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान अरविंदचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मंगळवारीच येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आणला गेला; परंतु अरविंद याच्या मृतदेहाची स्कॅनिंग करावी आणि इन कॅमेरा शवविच्छेदन करण्यात यावे, अशी मागणी नातेवाईकांनी केल्याने अरविंदचे शवविच्छेदन बुधवारी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बुधवारी दुपारी ११.४५ वाजण्याच्या सुमारास अरविंदच्या मृतदेहाचे स्कॅनिंग करून इन कॅमेरा शवविच्छेदन सुरू झाले. ते दुपारपर्यंत पूर्ण झाले. त्यानंतर अरविंदचे पालक व नातेवाईकांनी अरविंदच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी 'जेएसपीएम'चे अध्यक्ष अजित शिवाजी पाटील कव्हेकर यांना जबाबदार धरून त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा, जोपर्यंत 'जेएसपीएम'च्या संस्थाध्यक्षावर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत प्रेत ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेतली. या वेळी असंख्य सामाजिक कार्यकर्ते ही उपस्थित होते.



अरविंदचे पालक व नातेवाईक त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिल्याने एमआयडीसी पोलिसांनी सहदेव गणपती तरकसे, रा. मोतीनगर लातूर यांचा पुरवणी जबाब दि. ३१ जुलै रोजी घेतला. अरविंदच्या मृत्यूस 'जेएसपीएम' संस्थाध्यक्ष अजित शिवाजी पाटील कव्हेकर, प्राचार्य गोविंद शिंदे, त्यांचे सहकारी बिराजदार सर आणि सुरक्षा रक्षक (नाव माहित नाही) हे जबाबदार असून यांची नावे फिर्यादीत समाविष्ट करावीत, असा जबाब सहदेव तरकसे यांनी पुरवणी जबाबात दिला. पोलिसांनी तरकसे यांचा पुरवणी जबाब नोंदवून घेऊन तसे पत्र एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन द्रोणाचार्य यांच्या स्वाक्षरीने अरविंदच्या पालकांना देण्यात आले. त्यानंतर पालकांनी अरविंदचा मृतदेह स्वीकारून अन्त्यविधीसाठी पांगरीला रवाना झाले.

अ‍ॅट्रॉसिटीचाही गुन्हा दाखल

अरविंद खोपे या अल्पवयीन मुलाचा 'जेएसपीएम' संस्थेत संशयास्पद मृत्यू झाला. या प्रकरणी 'जेएसपीएम'चे अध्यक्ष अजित शिवाजी पाटील कव्हेकर यांच्यासह ५जणांविरुद्ध अरविंदच्या मरणास जबाबदार धरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला तसेच अ‍ॅट्रॉसिटीचाही गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास डीवायएसपी फुंदे करीत आहेत.

# रेल्वेच्या ब्लॉकमुळे प्रवाशांची एस.टी.ला गर्दी

सोलापुर : रेल्वेच्या ब्लॉकमुळे सोलापुरातून पुणे, मुंबईला जाणाऱ्या रेल्वे रद्द झाल्या. परिणामी, ही सर्व गर्दी गत दोन दिवसांपासून एस.टी. कडे वळाल्यामुळे सोलापूर बसस्थानकावर पुणे, मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढली आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एम.टी. प्रशासनाकडून जादा बस सोडण्यात आल्या, मात्र प्रवासी संख्येच्या तुलनेत बस कमी असल्यामुळे स्थानकावर प्रवाशांची गर्दी पाहायला मिळाल्याचे चित्र सध्या दिसत आहे. दरम्यान, दौंड रेल्वेस्थानक, दीड कॉर्डलाईन या ठिकाणी नॉन इंटरलॉकिंगचे काम एक ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यात पुणे–सोलापूर–पुणे इंद्रायणी, शताब्दी, हुतात्मा एक्स्प्रेस यासह अन्य डेमू मेल एक्स्प्रेस रद्द केल्यामुळे रेल्वेस्थानकावरील प्रवाशांची गर्दी एस.टी. स्थानकावर आली आहे. रेल्वे प्रशासनाने ब्लॉकमुळे रेल्वे रद्द केल्या आहेत. सोलापूर विभागाने सोलापूर, अक्कलकोट,आदी आगारांतून पुणे, मुंबईला जाण्यासाठी जादा बस सोडल्या आहेत. त्यामुळे रेल्वे स्थानकाकील सर्व गर्दी दोन दिवसांपासून बसस्थानकावर पाहायला मिळत आहे. सकाळी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. दुपारनंतर पुण्यातून येणाऱ्या गाड्यांना उशीर होत असल्याने सोलापुरातून पुण्याला जाणाऱ्या गाड्यांना उशीर होऊ लागला आहे. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी पाहायला मिळत आहे. प्रवाशांच्या तुलनेत बसची संख्या कमी असल्यामुळे आणि पुण्यावरून बस सोलापूरला उशिरा येत असल्याने प्रवाशांना तासन्तास बसस्थानकावर पंढरपूर, बार्शी ताटकळत थांबावे लागत आहे. सोलापूर बसस्थानकावर प्रवाशांची गर्दी वाढत आहे. बस आल्यानंतर प्रवाशांची झुंबड उडत आहे. या धावपळीत लहान मुले, महिला, वृद्धांचे हाल होत आहेत. यासाठी एस.टी. प्रशासनाने वाहतूक नियंत्रक यासह एस.टी.चे अधिकारी, कर्मचारी बसस्थानकामध्ये प्रवाशांना रांगा लावण्यास भाग पाडत आहेत. यामुळे संभाव्य होणारी प्रवाशांची चेंगराचेंगरी टळत आहे. सोलापूर–पुणे महामार्गावर वाहनांची गर्दी वाढली असून बहुतांश व्यक्तींनी खासगी वाहने बाहेर काढली. तसेच सोलापूरहून पुण्याला जाणार्यांची गर्दी अधिक असल्यामुळे सोलापूर–पुणे महामार्गावर वाहनांची संख्या वाढली आहे. यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. लांबपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्यामुळे दुपारनंतर बहुतांश गाड्यांना पुण्यात जाण्यास उशीर होत आहे.

# अवघड काम यशस्वी करुन घेण्यात नारायण शिंदेचा हातखंडा होता - एसडीओ रोहिणी नऱ्हे

लातूर :– महसूल विभागाचा कामाचा प्रचंड लोड असतो पण कसे करुन घ्यायचे,त्याबरोबरच ते चांगले कसे करायचे यात नारायण शिंदे यांचा हातखंडा होता,तो कर्मचार्यासाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन लातूर उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी केले.







लातूर तहसील संगांनियोअ शहर विभागचे अव्वल कारकून नारायण शिंदे हे दि.३१ जुलै २०२४ रोजी ३७ वर्षांच्या सेवेतून निवृत्त झाल्याबद्दल आज सायंकाळी तहसील कार्यालयाच्यावतीने त्यांच्या त्यांच्या सहचारिणी शिंदे यांच्या शाल,पुष्पहार भेटवस्तू देवून फ़ेटा बांधून पेढा भरवून निरोप देण्यात आला.त्यावेळी अध्यक्षपदावरुन त्या बोलत होत्या.मंचावर तहसीलदार सौदागर तांदळे,अव्वल कारकून सुधीर देशमुख,नेटके,महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माधव पांचाळ आदींचीउपस्थिती होती.

नारायण शिंदे यांनी संकीर्ण असो की कोणताही विभाग असो त्यात अतिशय प्रामाणिकपणे,सकारात्मक व निष्ठेने काम केले. आपल्या मितभाषी,उत्साही,प्रेरणादायी व्यक्तीमत्वाने त्यांनी सर्वांशी अतिशय कौटुंबिक जिव्हाळा निर्माण केला.आपल्याकडे आलेले काम काम कितीही अवघड असले तरी ते सोडवत असत.त्यांच्या कामाचा अनुभव घेण्यासारखा आहे असेही रोहिणी नर्हे यांनी नमुद केले.

सेवा कशी चांगली द्यावी,एखाद्या किचकट प्रकरणातून कसा मार्ग काढावा याची जिद्द,धमक असणारे,दुसर्याप्रती नेहमी सकारात्मक भावना ठेवणारे,सहकार्यांच्या सुखदुःखात सामील होणारे,जनतेप्रती जिव्हाळा असणारे,संवेदनशील मनाचे नारायण शिंदे हे सर्वांचे दादा ठरले,धावणे जलतरण यात ते तरबेज आहेत असे सांगून त्यां च्या प्रेमळ स्वभावामुळे प्रचंड मोठा जनमाणस त्यांनी जोडला आहे,त्यांचे गुण नवीन कर्मचार्यांनी अंगिकारावे असे आवाहन तहसीलदार सौदागर तांदळे यांनी व्यक्त केले.

प्रदीर्घ सेवा काळात अनेक चांगल्या अधिकारी,कर्मचार्यांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन अनेक आठवणींचा पट नारायण शिंदे यांनी सत्काराला उत्तर देताना मांडला.

याप्रसंगी मंडल अधिकारी रामराव झाडे,नागनाथ खंदाडे,संजय घाडगे,अव्वल कारकून बाशीद शेख,अविनाश साठे,सुप्रिया बिराजदार,संगीता पाटील, तलाठी दत्ता शिंदे,महसूल सहाय्यक संजय गबाळे, अमित जगताप,पत्रकार इस्माईल शेख,पत्रकार बाळ होळीकर आदिंनी मनोगत व्यक्त केले.

सद्भावनेने भारलेल्या या कार्यक्रमाला महसूल कर्मचारी संघटनेचे प्रदेश सचिव मंजूरखाँ पठाण,अव्वल कारकून संपत माने,अव्वल कारकून संजय जाधव,माजी कर्मचारी शिवाजी कांबळे, तलाठी सचिन तावशीकर,तसेच मिनाक्षी कलबुर्गे,बाळासाहेब जाधव,विठ्ठल काळे,वावरे,कुंभार, मोरे, अंबादास याजमले,विनाद मस्के,ज्ञानेश्वर काळे,तांत्रिक सहाय्यक महेश आदमाने यांच्यासह तलाठी,मंडळ अधिकारी,महसूल सहाय्यक,कोतवाल व शिंदे परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

# मराठवाड्यात पावसाचा खंड?


छ. संभाजीनगर : प्रतिनिधी राज्यात मध्य पश्चिम महाराष्ट्रात सध्या जोरदार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना मराठवाड्याला मात्र अजून पावसाची प्रतीक्षाच आहे. मराठवाड्यातील बहुतांश ठिकाणी समाधानकारक पाऊस नसल्याने धरणे अजून कोरडीच असल्याचे चित्र आहे. पावसाळ्याचे दोन महिने संपले आहेत. आकडेवारीनुसार मराठवाडा विभागात ५९ टक्के पाऊस झाला आहे. मात्र नद्या आणि धरणे अजूनही कोरडीच असल्याचे चित्र आहे, त्यात ही परिस्थिती असताना पुढील २२ दिवस पावसाचा खंड राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांकडून वर्तविल्याने मराठवाड्यात चिंताजनक परिस्थिती आहे. जायकवाडी अवघ्या ७ टक्क्यांवर सध्या जायकवाडी प्रकल्पात अवघा ७ टक्के पाणीसाठा आहे. या धरणसाठ्यात हळूहळू वाढ होत असली तरी सिंचनासह, शेती आणि पिण्यास किती दिवस हे पाणी पुरेल याची शंका आहे. मराठवाडा विभागात ११



मोठे, ७५ मध्यम तर ७४९ लघु प्रकल्प आहेत. गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवर ४२ बंधारे आहेत. एकूण ८७७ प्रकल्पांमध्ये अवघा २० टक्क्यांपर्यंत जलसाठा आहे. त्यामुळे लघु आणि मध्यम प्रकल्प दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पिकांना दिलासा मराठवाड्यात पावसाळा सुरू झाल्यापासून ६० दिवसांत २१ दिवस पाऊस झाला आहे. पर्जन्यमापकांच्या आकड्यांनुसार विभागात ६७९.५ मि.मी.च्या तुलनेत ४०४.२ मि.मी. पाऊस झाल्याचे दिसते आहे. ५९ टक्के पावसामुळे फक्त पिकांना दिलासा मिळाला आहे, धरणांत पाणी आलेले नाही. बीड, हिंगोलीत काय स्थिती? जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बीडमधील माजलगाव धरण अजूनही शून्यावर आहे. मांजरा धरणात १.५४ टक्के पाणीसाठा शिल्लक असून हिंगोलीतील सिद्धेश्वर धरण २८.५७ टक्के तर येलदरी ३१.७१ टक्के भरले आहे. राज्याच्या तुलनेत मराठवाड्यातील पाणीसाठा अजूनही सर्वांत कमी असून तो केवळ १७.५६ टक्के एवढा आहे. नांदेडला दिलासा, परभणीत काय स्थिती? नांदेड जिल्ह्यातील निम्न मनार आता ५० टक्के भरले आहे तर विष्णुपुरी ९४.२३ टक्के भरल्याने नांदेडकरांना दिलासा मिळाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील निम्न तेरणात २८.४७ टक्के, सीना कोरेगाव प्रकल्प अजून शून्यावरच आहे. परभणीतील निम्न दुधना प्रकल्पात केवळ ८.१४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

# पहिलीच्या विद्यार्थ्याने केला तिसरीच्या वर्गातील मुलावर गोळीबार

पाटणा : बिहारमधील सुपौल जिल्ह्यातील त्रिवेणीगंजमध्ये आज एक खळबळजनक घटना समोर आली आहे. लालपट्टी येथील एका खासगी शाळेतील प्रथम वर्गातील ५ वर्षीय विद्यार्थ्याने तिसरीत शिकणा–या १० वर्षीय विद्यार्थ्यावर गोळी झाडली. ही गोळी विद्यार्थ्याच्या डाव्या हाताला लागली. जखमी मुलाला तात्काळ उपविभागीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार विद्यार्थ्याची प्रकृती धोक्याबाहेर आहे.



या घटनेनंतर शाळेत एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ शाळेत धाव घेतली आणि तपास सुरू केला. विद्यार्थ्याकडे हे हत्यार कसे आले, याचा शोध पोलिस घेत आहेत. स्थानिक लोकांनी सांगितले की, आरोपी विद्यार्थ्याचे वडील पूर्वी या शाळेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करायचे. मुलगा शाळेच्या बॅगमध्ये पिस्तूल घेऊन आला होता. शाळेच्या प्रार्थनेपूर्वी आज सकाळी ही घटना घडली. जखमी विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांनी सांगितले की, शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या मुलाला गोळी लागल्याची माहिती दिली. आरोपी विद्यार्थ्याच्या वडिलांना याची माहिती मिळताच त्यांनी तडकाफडकी शाळा गाठून मुख्याध्यापकांच्या टेबलावर ठेवलेले पिस्तूल आणि त्यांचा मुलगा घेऊन शाळेच्या भिंतीवरून उडी मारून पळ काढला. यावेळी वडिलांनी त्यांची दुचाकी शाळेतच सोडली.

आरोपीच्या पालकांची चौकशी करावी–पीडित मुलांच्या कुटुंबाची मागणी भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी जखमी विद्यार्थ्याच्या कुटुंबीयांनी शाळा प्रशासन आणि पोलिसांकडे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. या घटनेनंतर पीडित मुलाच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे. लहान मूल असे कृत्य करेल यावर त्यांचा विश्वास बसत नाही. आरोपी मुलाच्या पालकांचीही चौकशी करावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE